


ह. भ. प. श्री दासगणूकृत

# श्री साईनाथ स्तवनमंजरी व श्री साई सुमनांजली

(मराठी)

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

**या पुस्तकातील ओवी क्र. ६७ (पान नं. १२) बाबत**

मशीद, आपुले वसतिस्थान। विंधावांचून असती कान।।
फात्याच्या तऱ्हा पाहून। यवन म्हणणे भाग तुम्हां ।।

वरील विधान वस्तुस्थितीस धरून नाही. कारण स्वर्गीय स्वामी साईशरणानंदांनी स्तवनमंजरीचा गुजराती भाषेत अनुवाद केला आहे. त्यात त्यांनी वरील ओळीला टीप दिली आहे. तिचा भावार्थ असा, ''ह.भ.प. दासगणूंनी बाबांच्या कानांचे निरीक्षण केल्याचे दिसत नाही. बाबांचे कान टोचलेले होते व त्यांचा सुंता झाला नव्हता. हे अनुवादकाने स्वतः प्रत्यक्ष पाहिले होते. दुपारच्या नैवेद्याच्या वेळेशिवाय अन्य वेळी कुणी प्रसाद आणला व बडे फकीर बाबा किंवा अन्य कोणी मुसलमान उपस्थित असेल, तर तो परमेश्वरार्पण करण्यासाठी बाबा कुराणातील सुरा म्हणण्यास सांगत व स्वतः ही मदत करीत. परंतु मुसलमानांच्या अनुपस्थितीत स्वतः बाबा तसे करताना अनुवादकाच्या दृष्टीस पडले नाहीत.'' – **प्रकाशक**

**प्रकाशक** : अध्यक्ष – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अहमदनगर
**सर्वाधिकार** : सर्व हक्क संस्थान अधीन, **आवृत्ती** : ३३ वी – २०१२, **प्रती** : १,००,०००
**पुस्तक विक्रीसाठी उपलब्ध :**
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी, अहमदनगर ४२३ १०९
**मुंबई कार्यालय** – साई निकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई – ४०० ०१४
**किंमत** : ₹ 2/-
**मुद्रक** : कमर्शियल बुक बायडिंग वर्क्स, मुंबई - ४०००२५.

ह.भ.प.दासगणूकृत

# श्रीसाईनाथ-स्तवनमंजरी



श्रीगणेशाय नमः। हे सर्वाधारा मयूरेश्वरा[1] सर्वसाक्षी गौरीकुमारा॥ हे अचिंत्या लंबोदरा। पाहि[2] मां श्रीगणपते॥ १॥ तू सकल गणांचा आदि ईश।

१ गणपती, २ माझें रक्षण कर.

म्हणूनि म्हणती गणेश॥ तूं संमत सर्व शास्त्रांस। मंगलरूपा भालचंद्रा।।२॥ हे शारदे वाग्विलासिनी। तू शब्द सृष्टीची स्वामिनी॥ तुझें अस्तित्व म्हणूनी। व्यवहार चालती जगताचे॥३॥ तूं ग्रंथकाराची देवता। तूं भूषण देशाचें सर्वथा॥ तुझी अवघ्यांत अगाध सत्ता। नमो तुजसी जगदंबे॥४॥ हे पूर्णब्रह्मा संतप्रिया। हे सगुणरूपा पंढरीराया॥ कृपार्णवा परम सदया। पांडुरंगा नरहरे॥५॥ तूं अवघ्यांचा सूत्रधार। तुझी व्याप्ती जगभर॥ अवघीं शास्त्रें विचार। करिती तुझ्या स्वरूपाचा॥६॥ पुस्तकज्ञानी जे जे कोणी। त्यां तूं न गवससी चक्रपाणी॥ त्या अवघ्या मूर्खांनीं। शब्दवाद करावा॥७॥ तुला जाणती एक संत।

१ सर्व देवांचा पहिला देव, ईश्वर, प्रमुख. २ कृपेच्या समुद्रा. ३ विष्णु.
४ केवळ शाब्दिक पांडित्य; पोकळ बडबड.

बाकीचे होती कुंठित॥ तुला माझा दंडवत। आदरें हा अष्टांगी॥८॥ हे पंचवक्त्रा शंकरा। हे नररूंडमालाधरा॥ हे नीलकंठा दिगंबरा। ॐकाररूपा पशुपते॥९॥ तुझें नाम ज्याचे ओठीं। त्याचें दैन्य जाय उठाउठीं॥ ऐसा आहे धूर्जटी। महिमा तुझ्या नावाचा॥१०॥ तुझ्या चरणां वंदून। मी हें स्तोत्र करितों लेखन॥ यास करावें साह्य पूर्ण। तूं सर्वदा नीलकंठा॥११॥ आतां वंदूं अत्रिसुता। इंदिराकुलदैवता॥ श्रीतुकारामादि सकल संतां। तेवीं अवघ्या भाविकांसी॥१२॥ जय जयाजी साईनाथा। पतितपावना कृपावंता॥ तुझ्या पदीं ठेवितों माथा। आतां अभय असूं दे॥१३॥ तूं पूर्णब्रह्मा सौख्यधामा। तूंचि विष्णु नरोत्तमा॥ अर्धांगी ती ज्याची उमा। तो कामारी तूंच की॥१४॥

१.पांच मुखें असलेला, २.मनुष्यांच्या शिरांची माला धारण करणारा, ३.ब्रह्मस्वरूपी (ॐ=ब्रह्म), ४.सत्वर, त्वरित, ५.दत्त, ६.विष्णु, ७.मदनाचा शत्रु शंकर.

तूं नरदेहधारी परमेश्वर। तूं ज्ञाननभींचा दिनकर॥ तूं दयेचा सागर। भवरोगा औषधी तूं॥ १५॥ तूं हीनदीना चिंतामणी। तूं तंव भक्तां स्वर्धुनी॥ तूं बुडतियांना भव्य तरणी। तूं भीतांसी आश्रय॥ १६॥ जगाचें आद्य कारण। जें कां विमलचैतन्य॥ तें तुम्हीच आहा दयाघन। विश्व हा विलास तुमचाचि॥ १७॥ आपण जन्मरहित। मृत्युही ना आपणांप्रत॥ तेंच अखेर कळून येत। पूर्ण विचारें शोधितां॥ १८॥ जन्म आणि मरण। हीं दोन्हीं अज्ञानजन्य॥ दोहोंपासून अलिप्त आपण। मुळींच महाराजा॥ १९॥ पाणी झऱ्यांत प्रगटलें। म्हणून कां तेथ उपळलें॥

१.संसार. २ गंगानदी. ३ नौका. ४ भ्यालेल्यांना. ५ मायेची उपाधी न लागलेलें केवळ ब्रह्म. ६ खेळ. ७ अक्षर म्हणजे कधी नाशै न पावणाऱ्या ब्रह्म स्वरूपाच्या अज्ञानामुळे जन्ममृत्यु सत्य भासतात, पण हे सद्गुरो! आपण केवळ ब्रह्मस्वरूप असल्यामुळे आपण जन्ममृत्यूंपासून अलिप्तच आहांत, 'अक्षर' आहांत. ८.पाझर फुटून बाहेर आले.

ते पूर्वीच होतें पूर्ण भरलें। आले मात्र आंतुनी॥ २०॥ खांचेंत आलें जीवन। म्हणूनि लाधलें अभिधान॥ झरा ऐसें तिजलागून। जलाभावीं खांचचि॥ २१॥ लागला आणि आटला। हें मुळीं ठावें न जला॥ कां कीं जल खांचेला। देत नव्हतें महत्व मुळीं॥ २२॥ खांचेसी मात्र अभिमान। जीवनाचा परिपूर्ण॥ म्हणून तें आटतां दारूण। दैन्यावस्था ये तिसी॥ २३॥ नरदेह ही खांच खरी। शुद्ध चैतन्य विमल वारी॥ खांचा अनंत होती जरी। तरी न पालट तोयाचा॥ २४॥ म्हणून अजन्मा आपणां। मी म्हणतसे दयाघना॥ अज्ञाननगाच्या कंदना। करण्या व्हावें वज्र तुम्ही॥ २५॥ ऐशा खांचा आजवर। बहुत झाल्या भूमीवर॥

२ पाणी, ३ अत्यंत, ४ पाणी, ५ देह खांचेसारखा, त्यात चैतन्याचें शुद्ध जीवन उत्पन्न होतें, खांचा विविध पण जीवन एक त्याप्रमाणे देह अनेक पण चैतन्य एकच. ६ पर्वत. ७ नाश ८ व्यक्ति

हल्ली अजून होणार। पुढेही कालावस्थेनें॥ २६॥ त्या प्रत्येक खांचेप्रत। निराळें नांवरूप मिळत॥ जेणेंकरून जगतात। ओळख त्यांची पटतसे॥ २७॥ आतां चैतन्याप्रत। मी-तूं म्हणणें ना उचित॥ कां कीं जेथें न संभवतें द्वैत। तेंचि चैतन्य निश्चयें॥ २८॥ आणि व्याप्ती चैतन्याची। अवघ्या जगाठायीं साची॥ मग मी-तूं या भावनेची। संगत कैशी लागते॥ २९॥ जल मेघगर्भींचें। एकपणें एक साचें॥ अवतरणें भूवरी होतां त्याचे। भेद होती अनेक॥ ३०॥ * जें गोदेच्या पात्रांत। तें गोदा म्हणून वाहिले जात॥ जें पडे कूपांत। तैसी न त्याची योग्यता॥ ३१॥

१.मूळ चैतन्यापासून नामरूपाची व्यक्ति निर्माण होते. त्या ठिकाणीं "मी" "तूं" हा भेदच रहात नाही. * ओवी ३० ते ४८ ह्या ओव्यांत संतांवर गोदावरी तीर्थाचे सुंदर रूपक योजिले आहे. ह्या संतांच्या गोदावरींत जगाच्या प्रारंभापासून आजतागायत अनेक संतरूपी जलांची भर पडून ह्या संतगोदावरीचा प्रवाह सतत वहात आहे.

संतरूप गोदावरी। तेथील तुम्ही आहां वारी॥ आम्ही थिल्लर[१] कूप सरोवरी। म्हणूनि भेद तुम्हां आम्हां॥ ३२॥ आम्हां व्हावया कृतार्थ। आलें पाहिजे तुम्हांप्रत॥ शरण सर्वदा जोडून हात। का कीं पवित्रता तुम्हांठाई॥ ३३॥ पात्रामुळें पवित्रता। आली गोदा-जलासी सर्वथा॥ नुसत्या जलांत पाहतां। तें एकपणे एकचि॥ ३४॥ पात्र गोदावरीचें। जें कां ठरलें पवित्र साचें॥ तें ठरण्यांत भूमीचे। गुणदोष झाले साह्य पहा॥ ३५॥ मेघगर्भीच्या उदकाला। जो भूमिभाग न बदलवी भला॥ त्याच भूमीच्या भागाला। गोदा म्हणाले शास्त्रवेत्ते॥ ३६॥ इतरत्र जें जल पडलें। त्यानें पदगुणा[२] स्वीकारलें॥ रोगी कडू खारट झालें। मूळचें गोड असूनी॥ ३७॥ तैसें गुरूवरा आहे येथ। षड्रिपूंची[३] न घाण जेथ॥ त्या पवित्र पिंडाप्रत। संत अभिधान शोभतसे॥ ३८॥

१.डबकें, २ स्थान, स्थळ, जागा. ३ काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर.

म्हणून संत तीं गोदावरी। मी म्हणतों साजिरी॥ अवघ्या जीवांत आहे खरी। आपुली श्रेष्ठ योग्यता॥ ३९॥ जगदारंभापासून। गोदा आहेच निर्माण॥ तोयही भरलें परिपूर्ण। तुटी न झाली आजवरी॥ ४०॥ पहा जेव्हां रावणारी[1]। येता झाला गोदातीरीं॥ त्या वेळचें तेथील वारी। टिके कोठून आजवरी॥ ४१॥ पात्र मात्र तेंच उरलें। जल सागरा मिळालें॥ पावित्र्य कायम राहिलें। जल-पात्रांचें आजवरी॥ ४२॥ प्रत्येक संवत्सरी। जुनें जाऊनि नवें वारी॥ येत पात्राभीतरीं। तोच न्याय तुम्हां ठाया॥ ४३॥ शतक तेंच संवत्सर[2]। त्या शतकांतील साधुवर॥ हेंच जल साचार। नाना विभूती[3] ह्या लाटा॥ ४४॥ या संतरूप गोदेसी। प्रथम संवत्सरासी॥ पूर आला निश्चयेंसी। सनत्सनक[4]-सनंदनाचा[5]॥ ४५॥

१.राम. २ वर्ष. ३ असामान्य व्यक्ति. ४ ब्रह्मदेव. ५ ब्रह्मदेवाचे दोन मानसपुत्र.

मागून नारद तुंबर[1]। ध्रुव प्रल्हाद बलि नृपवर॥ शबरी[2] अंगद[3] वायुकुमर[4]। विदूर[5] गोपगोपिका[6]॥ ४६॥ ऐसे बहुत आजवरी। प्रत्येक शतकामाझारीं॥ पूर आले वरच्यावरी। तें वर्णण्या अशक्य मी॥ ४७॥ या सांप्रतच्या शतकांत। संतरुप गोदेप्रत॥ आपण पूर आलांत। साईनाथा निश्चयें॥ ४८॥ म्हणून तुमच्या दिव्य चरणां। मी करितों वंदना॥ महाराज माझ्या दुर्गणा। पाहूं नका किमपीही॥ ४८९॥ मी हीन दीन अज्ञानी। पातक्यांचा शिखामणी[7]॥ युक्त अवघ्या कुलक्षणांनी। परी अव्हेर करुं नका॥ ५९॥ लोहाअंगीचे दोष। मना न आणी परीस। गांवीच्या लेंड्या ओहोळास[8]। गोदा न लावी परतवूनि॥ ५१॥ माझ्यामधील अवघी घाण। आपुल्या कृपाकटाक्षेंकरुन॥ करा करा वेगें हरण। हीच विनंती दासाची॥ ५२॥

१. अश्वाचे मुख असलेला परमेश्वराचा एक भक्त. २. रामावतारांतील भिल्लीण. ३. वालीचा मुलगा. ४. मारुती. ५. पांडवांचा चुलता. ६. गौळी व गौळणी, ७. श्रेष्ठ, ८ ओढा.

परिसाचा संग होऊन । लोहाचें तें लोहपण॥ जरी न हेय गुरुवरा हरण। तरी हीनत्व परिसासी ॥५३॥ मला पापी ठेवूं नका। आपण हीनत्व घेऊं नका॥ आपण परीस मी लोह देखा। माझी चाड आपणातें।।५४।। बालक अपराध सदैव करितें। परी न माता रागावते।। हें आणून ध्यानातें। कृपाप्रसाद करावा ॥५५॥ हे साईनाथ सद्गुरु। तूंच माझा कल्पतरु॥ भवाब्धीचें भव्य तारुं । तूच असशी निश्चयें ॥५६॥ तू कामधेनू चिंतामणी। तूं ज्ञान-नभीचा वासरमणी॥ तू सद्गुणांची भव्य खाणी । अथवा सोपान स्वर्गीचा ॥५७॥ हे पुण्यवंता परम पावना। हे शांतिमूर्ति आनंदघना।। हे चित्स्वरुपा परिपूर्णा। हे भेदरहिता ज्ञानसिंधो ॥५८॥

१. संसारूपी सागर, २. सूर्य, ३. शिर्डी, ४.ब्रह्मस्वरूप.

हे विज्ञानमूर्ति नरोत्तमा। हे क्षमाशांतीच्या निवासधामा। हे भक्तजनांच्या विश्रामा। प्रसीद प्रसीद मजप्रती॥५९॥ तूंच सद्गुरु मच्छिंदर। तूच महात्मा जालंदर॥ तूं निवृत्तिनाथ ज्ञानेश्वर। कबीर शेख नाथ तूं॥६०॥ तूंच बोधला सावंता। तूच रामदास तत्वतां॥ तूच तुकाराम साईनाथा। तूच सखा माणिक प्रभु॥६१॥ या आपुल्या अवताराची। परी आहे अगम्य साची॥ ओळख आपुल्या जातीची। होऊं न देतां कवणातें ॥६२॥ कोणी आपणां म्हणती यवन। कोणी म्हणती ब्राह्मण॥ ऐसी कृष्णासमान। लीला आपण मांडिली ॥६३॥ श्रीकृष्णास पाहून॥ नाना प्रकारें वदले जन॥ कोणी म्हणले यदुभूषण॥ कोणी म्हणाले गुराखी॥६४॥

१. प्रसन्न हो, २-३. नाथपंथी सत्पुरुष, ४. शेख महंमद, श्रीगोंद्याचे योगी सत्पुरुष, ५. एकनाथ महाराज, ६. धामणगावचे माणकोजी बोधले. ७. सांवता माळी, ८. लोणीचे सखाराम महाराज, ९. हुमणाबादचे सत्पुरुष, १०. प्रकार.

यशोदा म्हणे सुकुमार बाळ। कंस म्हणे महाकाळ॥ उद्धेव म्हणे प्रेमळ। अर्जुन म्हणे ज्ञान जेठीं॥६५॥ तैसें गुरुवरा आपणांसी। जें ज्याच्या मानसी॥ योग्य वाटेल निश्चयेंसी। तें तें तुम्हा म्हणतसे॥६६॥ मशीद आपुलें वसतिस्थान। विंधावांचून असती कान॥ फात्याच्या तऱ्हा पाहून। यवन म्हणणे भाग तुम्हां॥६७॥ तैसी अग्नीची उपासना। पाहूनि आपुली दयाघना॥ निश्चय होत आमुच्या मना। कीं आपण हिंदू म्हणूनी॥६८॥ परी भेद हे व्यावहारिक। यातें चाहतील तार्किक॥ परी जिज्ञासू भाविक। त्यां न वाटे महत्व यांचे॥६९॥ आपुली आहे ब्राह्मस्थिती। जात गोत ना आपणांप्रती॥ आपण अवघ्यांचे गुरुमूर्ती। आहां आद्यकारण॥७०॥ यवन-हिंदूचे विपट आलें।

१ श्रीकृष्ण अवतारांतील परमेश्वराचा भक्त, २. पूर्ण ज्ञानी, ३. प्रार्थना, कुराणातील पहिला सुरा, अध्याय, ४. ब्रह्मैकस्थिति, जीवन्मुक्तावस्था, ५ वितुष्ट, तेढ, वैमनस्य

म्हणून तदैक्य करण्या भलें॥ मशीद-अग्नीला स्वीकारिलें। लीला भक्तांस दावावया॥७१॥ आपण जातगोतातीत॥ सद्वस्तु जी कां सत्॥ तीच तुम्ही साक्षात्। तर्कातीत साच कीं॥७२॥ तर्कवितर्कांचे घोडें। चालले किती आपणांपुढें॥ तेथें माझे बापुडे। शब्द टिकतील कोठुनी॥७३॥ परी पाहुनी तुम्हांला। मौन न ये धरितां मला॥ कां कीं शब्द हेच स्तुतीला। साहित्य आहेत व्यवहारी॥७४॥ म्हणून शब्देकरुन। जें जें होईल वर्णन॥ तें तें सर्वदा करीन। आपुल्या कृपाप्रसादें॥७५॥ संतांची योग्यता भली। देवाहून आगळी॥ अजादुजास नाही मुळीं। स्थान जवळ साधूंच्या॥७६॥ हिरण्यकश्यपु-रावणांला। देवद्वेषें मृत्यु आला॥ तैसा एकही नाही घडला। प्रकार संतहस्तानें॥७७॥ गोपीचंदे उकीरड्यासी। गाडिले जालंदरासी॥ परी त्या महात्म्यासी। नाहीं वाटला विषाद॥७८॥

१. ब्रह्म, २. साधन, ३. माझा तुझा, आपपर

उलट राजाचा उद्धार केला। चिरंजीव करुनि सोडिला। ऐशा संतांच्या योग्यतेला। वर्णन करावें कोठवरी॥ ७९॥ संत सूर्यनारायण। कृपा त्यांची प्रकाशपूर्ण। संत सुखद रोहिणी रमण। कौमुदी ती तत्कृपा॥ ८०॥ संत कस्तुरी सोज्ज्वळ। कृपा त्यांची परिमळ॥ संत इक्षु रसाळ। रसनव्हाळी तत्कृपा॥ ८१॥ संत सुष्टदुष्टांप्रती। समसमान निश्चिती॥ उलट पाप्यावरी प्रीती। अलोट त्यांची वसतसे॥ ८२॥ गोदावरीजलांत। मळकट तेंच धुवाया येत॥ निर्मळ ते संदुकींत। राहे लांब गोदेपासुनी॥ ८३॥ जें संदुकीमध्यें बसलें। तेंही वस्त्र एकदां आले॥ होतें धुवावया लागीं भलें। गोदावरीचे पात्रात॥ ८४॥ येथे संदुक वैकुंठ। गोदा तुम्ही निष्ठा घाट॥ जीवात्मे हेच पट। षड्विकार मळ त्यांचा॥ ८५॥

१. चंद्र, २. चंद्रप्रकाश, चांदणे, ३. उंस, ४. रसाची गोडी, ५. पेटींत ६. गोदावरी नदीपासून, ७. वस्त्र

तुमच्या पदाचें दर्शन। हेंच आहे गोदास्नान॥ अवघ्या मळातें घालवून। पावन करणें समर्था॥ ८६॥ आम्ही जन हे संसारी मळत आहों वरच्यावरी॥ म्हणून आम्हीच अधिकारी। संतदर्शन घेण्यास्तव॥ ८७॥ गौतमीमाजीं विपुल नीर। आणि धुणें मळकट घाटावर॥ तैसेंच पडल्या साचार। त्याचें हीनत्व गोदेसी॥ ८८॥ तुम्ही सघन शीत तरुवर। आम्ही पांथस्थ साचार॥ तापत्रयाचा हा प्रखर। तापलासे चंडांशु॥ ८९॥ त्याच्या तापापासून सदया। करा रक्षण गुरुराया॥ सत्कृपेची शीतळ छाया। आहे आपुली लोकोत्तर॥ ९०॥ वृक्षाखाली बैसून। जरी लागतें वरुन ऊन॥ तरी त्या तरुलागून। छायातरु कोण म्हणे॥ ९१॥ तुमच्या कृपेवीण पाहीं। जगांत बरें होणें नाही॥ अर्जुनाला शेषशायी। सखा लाधला धर्मास्तव॥९२॥

१. गोदावरी, २. पाणी, ३. खरोखर, ४. दाट, गर्द छायेचा, ५. आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक, ६. सूर्य, ७. विष्णु,शेषावर शयन करणारा.

सुग्रीव[1] - कृपेनें बिभीषणा[2]। साधलासे रामराणा॥ संतांमुळेंच मोठेपणा। लाधला श्रीहरीसी॥९३॥ ज्याचें वर्णन वेदांसी। न होय ऐशा ब्रह्मांसी। सगुण करवून भूमीसी। लाजविलें[3] संतांनीच॥९४॥ दामाजीनें बनविला महार। वैकुंठपती रुक्मिणीवर॥ चोखोबानें उचलण्या ढोर। राबविलें त्या जगदात्मया॥९५॥ संतमहत्व जाणून। पाणी वाही जगज्जीवन॥ संत खरेच यजमान। सच्चिदानंद प्रभूचे॥९६॥ फार बोलणें न लगे आतां। तूंच आम्हा माता पिता॥ हे सद्गुरु साईनाथा। शिर्डी ग्रामनिवासिया॥९७॥ बाबा तुमच्या लीलेचा। कोणा नलगे पाड साचा॥ तेथें माझी आर्ष[4] वाचा। टिकेल सांगा कोठून॥९८॥

---

१. रामावतरांतील कष्किंधेचा राजा, २. रावणाचा रामभक्त भाऊ, ३. निर्गुण ब्रह्माला सगुण रूप घ्यावयास लावून कमीपणा आणला. भक्तांकरिता परमेश्वरानें रामावतारांतील सगुण अवतार घेतला याकडे कटाक्ष. ४. असंस्कृत, गावंढळ

जड-जीवांच्या उद्धारार्थ। आपण आला शिर्डीत॥ पाणी ओतून पणत्यांत। दिवे तुम्ही जाळिले॥९९॥ सवा हात लाकडाची। फळी मंचक[1] करुन साची॥ आपुल्या योगसामर्थ्याची। शक्ति दाविली भक्तजनां॥१००॥ वांझपणा कैकांचा। तुम्ही केलात हरण साचा॥ कित्येकांच्या रोगांचा। बिमोड केलात उदीने[2]॥१०१॥ वारण्या ऐहिक संकटे। तुम्हां न कांही अशक्य वाटे॥ पिपीलिकेचे[3] कोठून मोठें। ओझें मानी गजपति[4]॥१०२॥ असो आतां गुरुराया। दीनावरी करा दया॥मी तुमच्या लागलों पायां। मागें न लोटा मजलागीं॥१०३॥ तुम्ही महाराज राजेश्वर। तुम्ही कुबेरांचे कुबेर॥ तुम्ही वैद्यांचे वैद्य निर्धार। तुम्हांविण ना श्रेष्ठ कोणी॥१०४॥ अवांतराचे पूजेस। साहित्य आहे विशेष॥ परी पूजावया तुम्हांस। जगीं पदार्थ न राहिला॥१०५॥

---

१. पलंग, २. उदीची राख, अंगारा, ३. मुंगी, ४. मोठा हत्ती

पहा सूर्याचिया घरीं। सण दिपवाळी आली खरी। परी ती त्यानें साजिरी। करावी कोणत्या द्रव्यें॥ १०६॥ सागराची शमवावया। तहान, जल ना महीं ठाया॥ वन्हीलागीं शेकावया। अग्नी कोठून द्यावा तरी॥ १०७॥ जे जे पदार्थ पूजेचे। ते ते तुमच्या आत्म्याचे॥ अंश आधींच असती साचे। श्रीसमर्थां गुरुराया॥ १०८॥ हें तत्वदृष्टीचें बोलणे परी न तैशी झाली मनें॥ बोललों अनुभवाविणें। शब्दजाला[१] निरर्थक॥ १०९॥ व्यावहारिक पूजन जरी। तुमचे करुं मी सांगा तरी॥ तें कराया नाहीं पदरीं। सामर्थ्य माझ्या गुरुराया॥ ११०॥ बहुतेक करुन कल्पना। करितों तुमच्या पूजना॥ तेंच पूजन दयाघना। मान्य करा या दासांचे॥ १११॥ आतां प्रेमाश्रुकरुन। तुमचे प्रक्षालितों चरण॥ सद्भक्तीचें चंदन। उगाळून लावितों॥ ११२॥

१. हे केवळ वरवर शब्दिक बोलणे, वाक्पांडित्य आहे अनुभव नसल्याने मनापासून नाही.

कफनी शब्दालंकाराची। घालितों ही तुम्हां साची॥ प्रेमभाव या सुमनाची। माळा गळ्यांत घालितों॥ ११३॥ धूप कुत्सितपणाचा। तुम्हांपुढे जाळितों साचा। जरी तो वाईट द्रव्याचा। परी न सुटेल घाण त्यासी॥ ११४॥ सद्गुरुविण इतरत्र। जे जे धूप जाळितात॥ त्या धूप द्रव्याचा तेथ। ऐसा प्रकार होतसे॥ ११५॥ धुपद्रव्यास अग्नीचा। स्पर्श होताक्षणी साचा॥ सुवास सद्गुण तदंगींचा। जात त्याला सोडून॥ ११६॥ तुमच्यापुढें उलटें होतें॥ घाण तेवढी अग्नीत जळते॥ सद्गुण उरती पाहण्यातें। अक्षयींचे जगास॥ ११७॥ मनींचें गळाल्या कुत्सितपण। मलरहित[१] होईल मन॥ गंगेचें गेल्यागढूळपण। मग ती पवित्र सहजचि॥ ११८॥ दीप मायामोहाचा। पाजळितों मी हा साचा॥ तेणें वैराग्यप्रभेचा[२]। होवो गुरुवरा लाभ मसी॥ ११९॥

१ पापरहित, २. तेज, प्रकाश, प्रभाव

शुद्ध निष्ठेचें सिंहासन। देतों बसावया कारण॥ त्याचे करुनियां ग्रहण।
भक्तिनैवेद्य स्वीकारा॥ १२०॥ भक्तिनैवेद्य तुम्ही खाणे। तद्रस मला पाजणें॥
कां कीं मी तुमचे तान्हें। पयावरी[1] हक्क माझा॥ १२१॥ मन माझें दक्षणा।
ती मी अर्पितों आपणां॥ जेणे नुरेल कर्तेपणा। कशाचाही मजकडे॥ १२२॥
आतां प्रार्थनापूर्वक मात्र। घालितों मी दंडवत॥ तें मान्य होवो आपणांप्रत।
पुण्यश्लोका साईनाथा॥ १२३॥

॥ प्रार्थनाष्टक॥

॥ श्लोक॥

शांतचित्ता महाप्रज्ञा। साईनाथा दयाघना॥
दयासिंधो सत्स्वरुपा। मायातंम[2]विनाशना॥ १॥ १२४॥
जातगोतातीता[3] सिद्धा। अचिंत्या करुणालया॥
पाहि मां पाहि मां[4] नाथा। शिर्डीग्रामनिवासिया॥ २॥ १२५॥

१. दूध, २. अज्ञान, ३. गोत्र. कुटुंबाची उपाधि नसलेला, ४. माझें रक्षण कर.

श्रीज्ञानोर्का[1] ज्ञानदात्या। सर्वमंगलकारका॥
भक्तचित्तमराळा[2] हे। शरणगतरक्षका॥ ३॥ ॥ १२६॥
सृष्टिकर्ता विरिंची[3] तूं। पाता[4] तूं इंदिरापती[5]॥
जगत्रया लया नेता। रुद्र[6] तो तूंच निश्चितीं॥ ४॥ ॥ १२७॥
तुजवीणें रिता कोठें। ठाव ना या महीवरी॥
सर्वज्ञ तूं साईनाथा। सर्वांच्या ह्रदयांतरी॥ ५॥ ॥ १२८॥
क्षमा सर्वापराधांची। करावी हेंचि मागणें॥
अभक्तिसंशयाच्या त्या। लाटा शीघ्र निवारणे॥ ६॥ ॥ १२९॥
तूं धेनू वत्स मी तान्हें। तूं इंदु[7] चंद्रकांत[8] मी॥
स्वर्नदी[9]रुप त्वत्पादा। आदरें दास हा नमी[10]॥ ७॥ ॥ १३०॥

१. सूर्य, २. हंस, ३. ब्रह्मदेव, ४. पालनकर्ता, ५. विष्णु, ६. प्रलय करणारा महादेव (शंकर=कल्याण करणारा महादेव, भव=उत्पन्न करणारा महादेव) ७. चंद्र, ८. चंद्रप्रकाशामुळे पाझरणारा खडा, ९. गंगा, १०. नमस्कार करितों

ठेव आतां शिरी माझ्या। कृपेचा करपंजर[१]॥
शोक चिंता निवारावी। गणू हा तव किंकर॥ ८ ॥ ॥ १३१ ॥
या प्रार्थनाष्टकेंकरुन। मी करितों साष्टांग नमन॥ पाप ताप आणि दैन्य। माझे निवारा लवलाहीं॥ १३२॥ तूं गाय मी वासरुं। तूं माय मी लेंकरूं॥ माझेविषयी नको धरुं। कठोरता मानसी॥ १३३॥ तूं मलयागिरी[३] चंदन। मी काटेरी झुडुप जाण। तू पवित्र गोदाजीवन। मी महापातकी॥ १३४॥ तुझें दर्शन होवोनियां। दुर्बुद्धि-घाण माझे ठाया॥ राहिल्या तैशीच गुरुराया। चंदन तुजला कोण म्हणे॥ १३५॥ कस्तुरीच्या सहवासें। मृत्तिका मोल पावतसे॥ पुष्पासंगे घडतसे। वास सूत्रा[४] मस्तकीं॥ १३६॥ थोरांची ती हीच रीती। ते ज्या ज्या गोष्टी ग्रहण करिती॥ त्या त्या वस्तु पावविती। ते महत्पदा कारणें॥ १३७॥

---

१. आश्रयस्थान होणारा हात (पंजर=पिंजरा), २. दास, ३. म्हैसूरमधील चंदनाविषयीं प्रसिध्द असलेला पर्वत, ४. दोरी.

भस्म कौपीनें[१] नंदीचा। शिवें केला संग्रह साचा॥ म्हणून त्या वस्तूंचा। गौरव होत चहूंकडे॥ १३८॥ गोपरंजनासाठी। वृंदावनी यमुनातटी॥ काला खेळला जगजेठी। तोही मान्य झाला बुधां॥ १३९॥ तैसा मी तो दुराचारी। परी आहें तुमच्या पदरीं॥ म्हणून विचार अंतरी। याचा करा हो गुरुराया॥ १४०॥ ऐहिक वा पारमार्थिक। ज्या ज्या वस्तूंस मानील सुख॥ माझे मन हे नि:शंक। त्या त्या पुरविणें गुरुराया॥ १४१॥ आपुल्या कृपेने ऐसें करा। मनालागी आवरा॥ गोड केल्यास सागरा। क्षारोदकपणाची नसे भीती॥ १४२॥ सागरा गोड करण्याची। शक्ति आपणांमध्ये साची॥ म्हणून दासगणूची। याचना ही पुरी करा॥ १४३॥ कमीपणा जो जो माझा। तो तो अवघा तुझा॥ सिद्धांचा[२] तूं आहेस राजा। कमीपणा न बरवा तुजसी॥ १४४॥

---

१. लंगोटी, २. ब्रह्मस्वरुप पावलेला, पूर्ण झालेला

आतां कशास्तव बोलूं फार। तूंच माझा आधार॥ शिशु मातेच्या कडेवर। असल्या निर्भय सहजचि॥१४५॥ असो या स्तोत्रासी। जे जे वाचतील प्रेमेंसीं॥ त्यांच्या त्यांच्या कामनेसी। तुम्ही पुरवा महाराजा॥१४६॥ या स्तोत्रास आपुला वर। हाचि असो निरंतर। पठणकर्त्यांचे त्रिताप दूर। व्हावे एक संवत्सरीं॥१४७॥ शुचिर्भूत होऊन। नित्य स्तोत्र करावें पठण॥ शुद्ध भाव ठेवून। आपुलिया मानसी॥१४८॥ हें अशक्य असलें जरी। तरी प्रत्येक गुरुवारी। सद्गुरुमूर्ति अंतरी। आणून पाठ करावा॥१४९॥ तेंही अशक्य असल्यास। प्रत्येक एकादशीस॥ वाचणें या स्तोत्रास। कौतुक त्याचें पहावया॥१५०॥ स्तोत्रपाठकां उत्तम गती। अंती देईल गुरुमूर्ती॥ ऐहिक वासना सत्वरगती। ह्यांची पुरवून श्रोते हो॥१५१॥ या स्तोत्राच्या

१. वर्षात

पारायणें। मंदबुद्धि होतील शहाणे॥ कोणा आयुष्य असल्या उणें। तो पठणें होय शतायु॥१५२॥ धनहीनता असल्या पदरीं। कुबेर येऊन राबेल घरीं॥ हें स्तोत्र वाचल्यावरी। सत्य सत्य त्रिवाचा॥१५३॥ संततिहीना संतान। होईल स्तोत्र केल्या पठण॥ स्तोत्र-पाठकाचे संपूर्ण। रोग जातील दिगंतरा॥१५४॥ भयचिंता निवेल। मानमान्यता वाढेल॥ अविनाश ब्रह्म कळेल। नित्य स्तोत्राच्या पारायणें॥१५५॥ धरा बुध हो स्तोत्राविशीं। विश्वास आपुल्या मानसीं॥ तर्कवितर्क कुकल्पनेसी। जागा मुळीं देऊ नका॥१६५॥ शिर्डी क्षेत्राची वारी करा। पाय बाबांचे चित्तीं धरा॥ जो अनाथांचा सोयरा। भक्तकामकल्पद्रुम॥१५७॥ त्याच्या प्रेरणेकरून। हें स्तोत्र केलें लेखन॥ मज पामराहातून। ऐसी रचना होय कैसी॥१५८॥ शके अठराशें चाळीसांत। भाद्रपद शुद्ध पक्षांत॥ तिथी गणेश-चतुर्थी सत्य। सोमवारीं द्वितीय प्रहरी*॥१५९॥

१.नष्ट होईल. * हे स्तोत्र श्रींच्या हयातीत ता.९-९-१९१८ रोजी लिहून पूर्ण झाले. त्यानंतर फक्त ३७ दिवसांनी, मंगळवार ता.१५ ऑक्टोबर सन १९१८ रोजी श्रीसाईबाबांनी देह ठेविला.

श्रीसाईनाथस्तवतमंजरी। पूर्ण झाली महेश्वरीं॥ पुनीतें[१] नर्मदेच्या तीरीं। श्रीअहिल्येसन्निध॥ १६०॥ महेश्वर क्षेत्र भलें। स्तोत्र तेथें पूर्ण झालें॥ प्रत्येक शब्दासी वदविलें। श्रीसाईनाथें शिरूनी मनी॥ १६१॥ लेखक शिष्य दामोदर[२]। यास झाला साचार॥ दासगूण मी किंकर। अवघ्या संतमहंतांचा॥ १६२॥ स्वस्ति श्रीसाईनाथस्तवनमंजरी। तारक हो भवसागरीं॥ हेंच विनवी अत्यादरीं। दास गणू श्रीपांडुरंगा॥ १६३॥

**श्रीहरिहरार्पणमस्तु। शुभं भवतु। पुंडलीकवरदा हरिविठ्ठल॥**

**सीताकांतस्मरण जय जय राम। पार्वतीपते हर हर महादेव**

**श्रीसद्गुरूसाईनाथ महाराज की जय॥**

॥ श्रीसद्गुरूसाईनाथार्पणमस्तु॥ शुभं भवतु॥

१ पवित्र. २ कै.दामोदर वामन आठवले.

॥ श्रीसाईनाथ सुप्रसन्न॥

गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णु-
गुंरूर्देवो महेश्वरः॥
गुरूः साक्षात्परब्रह्म
तस्मै श्रीगुरवे नमः॥
श्रीमत् परब्रह्मगुरूं स्मरामि।
श्रीमत् परब्रह्मगुरूं नमामि॥
श्रीमत् परब्रह्मगुरूं यजामि॥
श्रीमत् परब्रह्मगुरूं भजामि॥
ब्रह्मानंदं परमसुखदं
केवलं ज्ञानमूर्तिं।

द्वंद्वातीतं गगनसदृशं
तत्त्वमस्यादिलक्ष्यम्॥
एकं नित्यं विमलमचलं
सर्वधीसाक्षिभूतं।
भावातीतं त्रिगुणरहितं
सद्गुरूं तं नमामि॥
नित्यशुद्धं निराभासं
निराकारं निरंजनम्।
नित्यबोधं चिदानंदं
सद्गुरूं तं नमाम्यहम्॥

## श्रीसाईबाबा-अष्टोत्तरशतनामावलि:

१ ॐ श्रीसाईनाथाय नम:
२ ॐ लक्ष्मीनारायणाय नम:
३ ॐ कृष्णरामशिवमारुत्या-
दिरूपाय नम:
४ ॐ शेषशायिने नम:
५ ॐ गोदावरीतटशील-
धीवासिने नम:
६ ॐ भक्तहृदालयाय नम:
७ ॐ सर्वहृन्निलयाय नम:
८ ॐ भूतावासाय नम:
९ ॐ भूतभविष्यद्भाववर्जिताय नम:
१० ॐ कालातीताय नम:
११ ॐ कालाय नम:
१२ ॐ कालकालाय नम:
१३ ॐ कालदर्पदमनाय नम:
१४ ॐ मृत्युंजयाय नम:
१५ ॐ अमर्त्याय नम:
१६ ॐ मर्त्याभयप्रदाय नम:
१७ ॐ जीवाधाराय नम:
१८ ॐ सर्वधाराय नम:
१९ ॐ भक्तावनसमर्थाय नम:
२० ॐ भक्तावनप्रतिज्ञाय नम:
२१ ॐ अन्नवस्त्रदाय नम:
२२ ॐ आरोग्यक्षेमदाय नम:
२३ ॐ धनमाङ्गल्यप्रदाय नम:
२४ ॐ ऋद्धिसिद्धिदाय नम:
२५ ॐ पुत्रमित्रकलत्रबन्धुदाय नम:
२६ ॐ योगक्षेमवहाय नम:

२७ ॐ आपद्बान्धवाय नम:
२८ ॐ मार्गबन्धवे नम:
२९ ॐ भुक्तिमुक्तिस्वर्गापवर्गदाय नम:
३० ॐ प्रियाय नम:
३१ ॐ प्रीतिवर्धनाय नम:
३२ ॐ अन्तर्यामिणे नम:
३३ ॐ सच्चिदात्मने नम:
३४ ॐ नित्यानन्दाय नम:
३५ ॐ परमसुखदाय नम:
३६ ॐ परमेश्वराय नम:
३७ ॐ परब्रह्मणे नम:
३८ ॐ परमात्मने नम:
३९ ॐ ज्ञानस्वरूपिणे नम:
४० ॐ जगत:पित्रे नम:
४१ ॐ भक्तानां मातृधातृपितामहाय नम:
४२ ॐ भक्ताभयप्रदाय नम:
४३ ॐ भक्तपराधीनाय नम:
४४ ॐ भक्तानुग्रहकातराय नम:
४५ ॐ शरणागतवत्सलाय नम:
४६ ॐ भक्तिशक्तिप्रदाय नम:
४७ ॐ ज्ञानवैराग्यदाय नम:
४८ ॐ प्रेमप्रदाय नम:
४९ ॐ संशयहृदयदौर्बल्यपाप
कर्मवासनाक्षयकराय नम:
५० ॐ हृदयग्रन्थिभेदकाय नम:
५१ ॐ कर्मध्वंसिने नम:
५२ शुद्धसत्त्वस्थिताय नम:
५३ ॐ गुणातीतगुणात्मने नम:

५४ ॐ अनन्तकल्याणगुणाय नमः
५५ ॐ अमितपराक्रमाय नमः
५६ ॐ जयिने नमः
५७ ॐ दुर्धर्षाक्षोभ्याय नमः
५८ ॐ अपराजिताय नमः
५९ ॐ त्रिलोकेषु अविघातगतये नमः
६० ॐ अशक्यरहिताय नमः
६१ ॐ सर्वशक्तिमूर्तये नमः
६२ ॐ सुरूपसुन्दराय नमः
६३ ॐ सुलोचनाय नमः
६४ ॐ बहुरूपविश्वमूर्तये नमः
६५ ॐ अरूपाव्यक्ताय नमः
६६ ॐ अचिन्त्याय नमः
६७ ॐ सूक्ष्याम नमः
६८ ॐ सर्वान्तर्यामिणे नमः
६९ ॐ मनोवागतीताय नमः
७० ॐ प्रेममूर्तये नमः
७१ ॐ सुलभदुर्लभाय नमः
७२ ॐ असहायसहायाय नमः
७३ ॐ अनाथनाथदीनबन्धवे नमः
७४ ॐ सर्वभारभृते नमः
७५ ॐ अकर्मनिककर्मसुकर्मिणे नमः
७६ ॐ पुण्यश्रवणकीर्तनाय नमः
७७ ॐ तीर्थाय नमः
७८ ॐ वासुदेवाय नमः
७९ ॐ सतां गतये नमः
८० ॐ सत्परायणाय नमः
८१ ॐ लोकनाथाय नमः


८२ ॐ पावनानघाय नमः
८३ ॐ अमृतांशवे नमः
८४ ॐ भास्करप्रभाय नमः
८५ ॐ ब्रह्मचर्यतपश्चर्यादि सुव्रताय नमः
८६ ॐ सत्यधर्मपरायणाय नमः
८७ ॐ सिद्धेश्वराय नमः
८८ ॐ सिद्धसंङ्कल्पाय नमः
८९ ॐ योगेश्वराय नमः
९० ॐ भगवते नमः
९१ ॐ भक्तवत्सलाय नमः
९२ ॐ सत्पुरुषाय नमः
९३ ॐ पुरूषोत्तमाय नमः
९४ ॐ सत्यतत्त्वबोधकाय नमः
९५ ॐ कामादिषड्वैरिध्वंसिने नमः
९६ ॐ अभेदानन्दानुभवप्रदाय नमः
९७ ॐ समसर्वमतसंमताय नमः
९८ ॐ श्रीदक्षिणामूर्तये नमः
९९ ॐ श्रीवेङ्कटेशरमणाय नमः
१०० ॐ अद्भुतानन्दचर्याय नमः
१०१ ॐ प्रपन्नार्तिहराय नमः
१०२ ॐ संसारसर्वदुःखक्षयकराय नमः
१०३ ॐ सर्ववित्सर्वतोमुखाय नमः
१०४ ॐ सर्वान्तर्बहिःस्थिताय नमः
१०५ ॐ सर्वमङ्गलकराय नमः
१०६ ॐ सर्वाभीष्टप्रदाय नमः
१०७ ॐ समरससन्मार्गस्थापनाय नमः
१०८ ॐ श्रीसमर्थ सद्गुरुसाईनाथाय नमः

श्रीमोहिनीराज पंडितकृत

(अभंग) .

शिरडीस ज्याचे लागतील पाय ॥ टळती अपाय सर्व त्याचे ॥१॥
माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हें हरेल सर्व त्याचें ॥२॥
जरी हे शरीर गेलों मी टाकून । तरी मी धांवेन भक्तांसाठी ॥३॥
नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धी माझ्या ठायीं ॥४॥
नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचित अनुभवे ॥५॥
शरण मज आला, आणि वायां गेला । दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥६॥
जो जो, मज भजे जैशा जैशा भावे । तैसा तैसा, पावे मीही त्यासी ॥७॥
तुमचा मी भार वाहीन सर्वथा। नव्हे हें अन्यथा वचन माझे ॥८॥
जाणा येथे आहे सहाय्य सर्वास । मागे जें जें त्यास तें ते लाभे ॥९॥
माझा जो जाहला काया-वाचा-मनीं ॥ तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥१०॥
साई म्हणें तोचिं, तोचि झाला धन्य ॥ झाला जो अनन्य माझ्या पायीं ॥११॥

## गलेफाचे माप




सर्व साईभक्तांना नम्र विनंती करण्यात येते की, त्यांनी गलेफ वरील मापांतच पाठविल्यास बाबांच्या समाधीस बरोबर होईल व केलेल्या खर्चाचे त्यांना समाधान होईल. भक्तांनी समाधीवर घालण्यासाठी आणलेला गलेफ संस्थानच्या कार्यालयात सकाळी नोंद करून घेणे. गलेफाऐवजी त्या मापांची चादर, शाल अगर इतर वस्त्रही चालेल.



।। ॐ श्री साईनाथाय नमः ।।